# महाराष्ट्र विधानपरिषद

## दिवसाच्या कामकाजाचा क्रम

## शुक्रवार, दिनांक १५ डिसेंबर, २०१७

## (सकाळी १०.३० ते ११.१५ वाजेपर्यंत)

**(क) : लक्षवेधी सूचना — (म.वि.प. नियम १०१ अन्वये) -**

**(मंगळवार, दिनांक १२, बुधवार, दिनांक १३ व गुरुवार, दिनांक १४ डिसेंबर, २०१७ रोजीच्या दिवसाच्या कामकाजाच्या क्रमात दर्शविण्यात आलेल्या लक्षवेधी सूचना) — (अनुक्रमांक (१) ते (३)) —**

(१) **श्री. प्रविण दरेकर, वि.प.स.** पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबीकडे **मुख्यमंत्र्यांचे** लक्ष वेधतील :-

"उल्हासनगर पालिकेतील मागासवर्गीय भरतीत मोठा घोटाळा झाल्याचे माहे नोव्हेंबर, २०१७ च्या सुमारास निदर्शनास येणे, या भरतीत महिला अधिकाऱ्यांनी बोगस प्रमाणपत्रे सादर करून नोकरी मिळविल्याचा धक्कादायक प्रकार उघडकीस येणे, तर कनिष्ठ लिपिक पदावरुन थेट सहायक आयुक्त पदावर पदोन्नती देण्यात येणे, त्यांच्याच काळात मोठ्या प्रमाणावर बेकायदा बांधकामे झाल्याचेही दिसून येणे, या प्रकरणी शासनाने तातडीने चौकशी करुन संबधित अधिकाऱ्यांवर कारवाई करण्याची आवश्यकता, यासंदर्भात शासनाने केलेली वा करावयाची कार्यवाही, शासनाची भूमिका व प्रतिक्रिया."

(२) **सर्वश्री. जयंत पाटील,** बाळाराम पाटील, सुनिल तटकरे, हेमंत टकले, श्रीमती विद्या चव्हाण, श्री. आनंद ठाकूर, ॲड. राहुल नार्वेकर, सर्वश्री. अशोक ऊर्फ भाई जगताप, संजय दत्त, श्रीमती हुस्नबानू खलिफे, जयवंतराव जाधव **वि.प.स.** पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबीकडे **मदत व पुर्नवसन मंत्र्यांचे** लक्ष वेधतील:-

"अरबी समुद्रात उसळलेले ओखी चक्रीवादळ रायगड समुद्र किनाऱ्यावर येऊन धडकल्याने राज्यातील रायगड, रत्नागिरी, सिंधुदुर्ग या जिल्ह्यात दिनांक ४ डिसेंबर २०१७ रोजी अवकाळी पावसाच्या जोरदार सरी कोसळणे, विशेषत: रायगड जिल्ह्यात आंबा, काजूचे उत्पादन मोठ्या प्रमाणात होणे, परंतु अवकाळी पडलेल्या पावसामुळे आंबा तसेच काजूवरील मोहर गळून पडल्याने यावर्षी आंबा व काजू उत्पादनात घट होणार असल्याने बागायतदारांचे मोठे नुकसान होणे, तसेच सुपारीची साठवणूक करणाऱ्या सहकारी संस्थांची सुपारी भिजल्यामुळे त्यांनाही आर्थिक फटका बसणे, अलिबाग तालुक्यातील (जि.रायगड) खंडाळे, वाडगाव, सहाण, उसर, वावे तसेच वाघ्रण, परहूरपाडा आदी ठिकाणी पांढऱ्या कांद्याचे मोठया प्रमाणात

उत्पादन घेण्यात येत असून, अवकाळी पडलेल्या पावसामुळे येथील कांद्याची रोपे मोडून पडणे व शेतात पाणी साचले असल्याने त्याचा परिणाम कांदा उत्पादनावर होणे, पावटा, तूर व इतर कडधान्य पीकांचे बऱ्याच प्रमाणात नुकसान होणे, तसेच अनेक ठिकाणी मळणीची कामे अजूनही प्रलंबित असल्यामुळे पावसामुळे भात भिजल्याने शेतकऱ्यांचे नुकसान होणे, पावसामुळे पेंढयांचेही मोठ्या प्रमाणात नुकसान झाल्याने शेतकऱ्यांसमोर गुरांच्या चाऱ्याचा प्रश्न निर्माण होणे, देवगड तालुक्यातील पडवणे, मिळबाव, सांबळडेग येथील रापण कंपनीच्या जाळीचे झालेले नुकसान, तर नाशिकसह निफाड, दिंडोरी, चांदवड, सटाणा या तालुक्यातील अनेक भागात मुसळधार पावसामुळे द्राक्षबागा, कांदा, डाळींब आणि गहू पिकाचे झालेले मोठ्या प्रमाणात नुकसान तसेच पुणे जिल्ह्यातील अनेक भागांत मुसळधार पाऊस पडल्याने त्यामुळे रब्बी हंगामात शेतकऱ्यांनी पेरलेल्या पिकांचे झालेले प्रचंड नुकसान, रायगड जिल्हयात काही ठिकाणी मच्छिमारांच्या बोटी बुडणे व बोटींचे नुकसानही होणे शासनाकडून या नुकसानग्रस्तांना नुकसान भरपाई देण्यासाठी उपाययोजना करण्याची आवश्यकता, याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व शासनाची प्रतिक्रिया."

**(३)** **सर्वश्री. अमरसिंह पंडित,** सतिश चव्हाण, धनंजय मुंडे, सुनिल तटकरे, जयवंतराव जाधव, हेमंत टकले, ॲड. निरंजन डावखरे, श्री. जगन्नाथ शिंदे, श्रीमती विद्या चव्हाण, सर्वश्री. रामराव वडकुते, किरण पावसकर, नरेंद्र पाटील, आनंद ठाकूर, ॲड. जयदेव गायकवाड, ॲड. राहुल नार्वेकर, सर्वश्री. ख्वाजा बेग, विक्रम काळे, प्रकाश गजभिये, विनायक मेटे, प्रा.जोगेन्द्र कवाडे, सर्वश्री. हरिसिंग राठोड, संजय दत्त, **वि.प.स.** पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबीकडे **कृषी मंत्र्यांचे** लक्ष वेधतील :-

"राज्यात सुमारे ४० लाख हेक्टर क्षेत्रात कपाशीची लागवड करण्यात येणे, या पैकी मराठवाडा विभागात १५.९२ लाख हेक्टर क्षेत्रात बी.टी.कपाशीची लागवड होणे, बी.टी. बियाणे विक्री करणाऱ्या कंपन्यापैकी सुमारे १८ कंपन्यांनी बोगस, बनावट बियाणे विक्री केल्यामुळे राज्यभरात कपाशीवर शेंदरी बोंड आळीसह इतर रोगांचा मोठा प्रादुर्भाव होणे, त्यामुळे राज्यात विशेषतः मराठवाडा आणि विदर्भात कपाशीच्या उत्पन्नात कमालीची घट होणे, बियाणे उत्पादक कंपन्यांनी बी.टी. बियाणांमध्ये बी.जी.-२ तंत्रज्ञान असल्यामुळे ११० दिवस व त्यापेक्षा अधिक कालावधीसाठी हे बियाणे शेंदरी बोंड आळी आणि इतर रोगांपासून पिकांचे संरक्षण करणार असल्याचा दावा करणे, कंपनीच्या या दाव्यामुळे शेतकऱ्यांनी अधिकचे पैसे देऊन ही बियाणे खरेदी करणे,मात्र बियाणे उत्पादक कंपन्यांनी शेतकऱ्यांची मोठी फसवणूक करणे, कापूस बियाणे कायदा, २००९ मध्ये नुकसान भरपाईची तरतूद असतानाही शेतकऱ्यांना अद्याप कोणतीही भरपाई न मिळणे, केंद्रीय कापूस

संशोधन केंद्र, नागपूर येथील शास्त्रज्ञ यांनी बी.टी. तंत्रज्ञान आता बोंड आळी व इतर रोगांना प्रतिकार  करत नसल्याने हे बियाणे संकरीत म्हणून विक्री करावे असे शासनास कळविलेले असणे, मात्र तरीही शासनाने या बाबत कोणतीही कार्यवाही मुदतीत न केल्याने शेतकऱ्यांचे करोडो रुपयांचे आर्थिक नुकसान होणे, बोंड आळीच्या संकटाने कापूस उत्पादक शेतकरी उध्वस्त होणे, नुकसानग्रस्त काही शेतकऱ्यांनी कृषी कार्यालयासमोर अंगावर रॉकेल ओतून आत्महत्येचा प्रयत्न करणे, अनेक शेतकऱ्यांनी आर्थिक नुकसानीमुळे नैराश्यापोटी आत्महत्या करणे, नुकसानग्रस्त शेतकऱ्यांना शासनाने सरसकट नुकसान भरपाई देण्याच्या मागणीसाठी राज्यभर तीव्र आंदोलने होणे, मात्र अद्याप कोणतीही आर्थिक मदत न केल्याने शेतकऱ्यांमध्ये तीव्र असंतोष पसरणे, या गंभीर प्रकरणात बियाणे उत्पादक कंपनी विरोधात कार्यवाही करून शेतकऱ्यांना मदत देण्यासाठी शासनाने तातडीने कार्यवाही करण्याची आवश्यकता व शासनाची प्रतिक्रिया."

(४) **सर्वश्री. शरद रणपिसे,** संजय दत्त, अशोक ऊर्फ भाई जगताप, रामहरी रुपनवर, आनंदराव पाटील, श्रीमती हुस्नबानू खलिफे, सर्वश्री. सुभाष झांबड, हरिसिंग राठोड, प्रा. जोगेन्द्र कवाडे, सर्वश्री. जनार्दन चांदूरकर, अमरनाथ राजूरकर, डॉ. सुधीर तांबे, आर्कि. अनंत गाडगीळ, श्री.जगन्नाथ शिंदे, ॲड.राहुल नार्वेकर, श्री.नरेंद्र पाटील, ॲड. निरंजन डावखरे, श्रीमती विद्या चव्हाण, सर्वश्री. हेमंत टकले, सुनिल तटकरे, धनंजय मुंडे, किरण पावसकर, **वि.प.स.** पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबीकडे **मुख्यमंत्र्यांचे** लक्ष वेधतील :-

"सन २००९ मध्ये मा.सर्वोच्च न्यायालयाने फेरीवाल्यांच्या पुनर्वसनासाठी व नागरीकांना त्रास होऊ नये यासाठी महानगरांना फेरीवाला धोरण तयार करण्याचे दिलेले आदेश, त्यानुसार सन २०१४ मध्ये फेरीवाला धोरण मा. राष्ट्रपतींच्या मान्यतेसाठी सादर केलेले असणे, त्यावर पुढील कार्यवाही झालेली नसणे, तदनंतर सन २०१४ मध्येच राज्य शासनाने फेरीवाला धोरणाचा मसुदा जाहिर केलेला असणे, त्यानंतर राज्य शासनाने फेरीवाला धोरण फेब्रुवारी, २०१७ च्या सुमारास संमत केलेले असणे, मात्र त्याच्या अंमलबजावणी संदर्भात पुढील कार्यवाही प्रलंबित असणे, मुंबईत सुमारे तीन लाख फेरीवाल्यांचा असलेला प्रश्न, मुंबईतील एल्फिन्स्टन रोड रेल्वे स्टेशनवरील दुर्घटनेनंतर माहे सप्टेंबर, २०१७ पासून फेरीवाल्यांचा ऐरणीवर आलेला प्रश्न, विविध पक्ष, संघटना यांचेकडून होत असलेली आंदोलने याचा विपरित परिणाम होऊन मुंबई लगतच्या वसई, कर्जत, कसारा इ. भागातून मुंबईमध्ये येऊन आपला शेतीमाल विकणाऱ्या शेतकऱ्यांचा बंद पडलेला व्यवसाय, त्यात सुयोग्य तोडगा काढण्याची व आंदोलनात नागरीकांना त्रास होऊ नये यासाठी लक्ष देण्याची गरज, फेरीवाला धोरणाबाबत

तातडीने लक्ष न दिल्यास गंभीर परिस्थिती निर्माण होण्याची निर्माण झालेली स्थिती, याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व शासनाची प्रतिक्रिया."

(५) **ॲड. अनिल परब, वि.प.स.** पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबीकडे **मुख्यमंत्र्यांचे** लक्ष वेधतील :-

"महाराष्ट्र नागरी सेवा (वर्तणूक) नियम, १९७९ मधील कलम १६ अन्वये कोणत्याही शासकीय कर्मचाऱ्यांने शासनाची पूर्वमंजूरी मिळाल्याशिवाय प्रत्यक्षपणे किंवा अप्रत्यक्षपणे कोणत्याही व्यापारात किंवा धंदयात गुंतता कामा नये किंवा दुसरी कोणतीही नोकरी स्वीकारता कामा नये, असा नियम असतांना कल्याण डोंबिवली महानगरपालिकेच्या कर निर्धारक व संकलक या पदावर कार्यरत असलेले अनिल लाड हे Maha talent IT Solution Private Limited व Kasturi Nivara Creators Private Limited या दोन्ही कंपनीच्या संचालक या पदावर कार्यरत असणे, उक्त कंपनीच्या दि कंपनी ॲक्ट १९५६, आटिकर्ल्स ऑफ असोसिएशन, मेमोरंडम ऑफ असोसिएशन, Maha talent IT Solution Private Limited मधील मुद्दा क्रमांक २० मध्ये श्री अनिल हरिभाऊ लाड हे तहहयात (कायमस्वरुपी) संचालकपदी असल्याचे मिनिस्ट्री ऑफ कंपनी अफेअर्सने महापालिकेला पाठविलेल्या पत्रव्यवहारानुसार आणि चौकशीअंती दोषी असल्याचा स्वयंस्पष्ट अहवाल असतांनाही आजमितीपर्यत दोषी श्री लाड यांच्यावर प्रथम निलंबन व महापालिकेतून बडतर्फ करण्याची कोणतीही कार्यवाही प्रशासनाकडून झालेली नसणे, यापूर्वीही महापालिकेचे कर्मचारी श्री.राजेंद देवचंद कांबळे, सफाई कामगार तसेच श्री.किरण प्रभाकर बाबडे, शिपाई यांच्यावर देखील महाराष्ट्र नागरी सेवा (वर्तणूक) नियम, १९७९ मधील कलम १६ अन्वये यांच्यावर कार्यवाही केलेली असतांना श्री.लाड यांच्याबाबत मात्र आयुक्तांकडून जाणीवपूर्वक कारवाई करण्यास होत असलेली दिरंगाई, दोषी श्री लाड यांच्यावर कोणतीच कारवाई होत नसल्याने लोकप्रतिनिधीनी यासंदर्भात मा.सभापती, महाराष्ट्र विधानपरिषद यांचेकडे लेखी पत्रव्यवहार करुन सदर बाब निदर्शनास आणली असता मा.सभापती यांनी तात्काळ दिनांक ११ जुलै, २०१७ रोजी आपल्या दालनात लोकप्रतिनिधी, आयुक्त, कल्याण-डोंबिवली महानगरपालिका, उपआयुक्त, सामान्य प्रशासन विभाग, कल्याण-डोंबिवली महानगरपालिका यांच्यासमवेत घेतलेल्या बैठकीत मा.आयुक्तांना सदर प्रकरणी निर्णय घेण्याकरिता महापालिकेच्या सर्वसाधारण सभेत सदर विषयावर निर्णय घेऊन सदर निर्णयाचा अहवाल सादर करण्याबाबत मा.सभापती यांनी दिलेले आदेश, सदर आदेशाचे उल्लंघन करुन मा.आयुक्तांनी सदर प्रकरणी शासनाच्या प्रधान सचिव-२, व सचिव, नगरविकास यांच्याकडे पत्रव्यवहार करुन विधी व न्याय विभागाचे अभिप्राय / मार्गदर्शन घेण्याबाबत केलेल्या सूचना, वास्तविक उपरोक्त संपूर्ण प्रकरण हे

महानगरपालिकेच्या अखत्यारित येत असतांना व याबाबतचा कोणताही अधिकार शासनाकडे नसतांनाही आयुक्तांनी सदर प्रकरणी शासनाकडे अभिप्राय मागवून दोषी श्री लाड यांना पाठिशी घालण्याचा केलेला प्रयत्न, मा.सभापती, महाराष्ट्र विधानपरिषद यांच्या आदेशांचा अशाप्रकारे केलेला अवमान, याकडे शासनाचे होत असलेले अक्षम्य दुर्लक्ष, याबाबत शासनाने सखोल चौकशी करुन दोषी श्री लाड यांना तात्काळ निलंबित / बडतर्फ करण्याची कार्यवाही करण्याची नितांत आवश्यकता, याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व शासनाची प्रतिक्रिया."

**(सकाळी ११.१५ ते ११.४५ वाजेपर्यंत)**

**(ख)** : **डॉ. (श्रीमती) नीलम गोऱ्हे,** श्रीमती विद्या चव्हाण, श्रीमती हुस्नबानू खलिफे, श्रीमती स्मिता वाघ, **वि.प.स. यांची म.वि.प. नियम ९७ अन्वये अल्पकालीन चर्चा – (३० मिनिटे) –**

"राज्याच्या सर्वच भागात महिला, अल्पवयीन मुलीवरील अत्याचार, हल्ल्यांच्या घटनामध्ये झालेली वाढ, अल्पवयीन मुलीना लग्न, नोकरीची आमिषे दाखवून, धमकावून त्यांच्यावर होत असलेल्या अत्याचाराच्या घटना, त्याचबरोबर मुंबईत रेल्वेतून प्रवास करणाऱ्या एकट्या महिला / अल्पवयीन मुलींवर भर दिवसा होत असलेले अत्याचाराची घटना दिनांक ३ डिसेंबर, २०१७ रोजी जुईनगर येथे विद्यार्थीनीला त्रास दिल्याने रेल्वेतून मारलेली उडी, दिनांक २४ ऑक्टोबर, २०१७ रोजी मुंबईत सीएसटी ते मस्जिद बंदर स्थानकादरम्यान विद्यार्थीनीला रेल्वेच्या डब्यात दिलेल्या त्रासाची घटना, सन २०१६ च्या गुन्हे विषयक अहवालातील प्रसिध्द झालेल्या माहितीनुसार ४३ टक्के पेक्षाही अधिक अल्पवयीन मुलीवर शेजारी, लग्नाचे अमिष, कुटुंबिय / नातलग, सहकर्मचारी, जोडीदार व भाऊ, वडील आजोबासारख्या नाते असलेल्या व्यक्तींनी अत्याचार केल्याचे उघड होणे, ग्रामीण भागात दिनांक २ डिसेंबर, २०१७ रोजी अहमदनगर जिल्ह्यात कर्जत तालुक्यात रुईगव्हाण येथे अल्पवयीन मुलीवर झालेला अत्याचाराची घटना, दिनांक १० डिसेंबर, २०१७ रोजी बीड जिल्ह्यातील वडवणी तालुक्यात ढोरवाडी, जळगाव मध्ये भुसावळ तालुक्यात बोहर्डी बुद्रुक येथील शाळेतील मुख्याध्यापकाने चार विद्यार्थीनीना मोबाईलवर अश्लील छायाचित्र दाखवण्याची घटना, दिनांक ९ डिसेंबर, २०१७ रोजी अमरावतीमध्ये मुलीवर अत्याचार करुन तिची अश्लील छायाचित्र काढण्याची धमकी देण्याची घटना, नागपूरमध्ये ही एका मुलीवर नुकतीच झालेली ॲसिड फेकीची घटना, कोल्हापूरमध्ये तरुणाच्या छळाला कंटाळून तरुणीने केलेली आत्महत्या, ग्रामीण भागात पडणारे दरोडे व महिलांवर पाशवी अत्याचाराच्या घटना, ग्रामीण भागात चोरीचे सोने घेणारे सराफ व त्यांना मदत करणारे दलाल यांच्यावर कारवाई करण्याची असलेली नितांत

गरज, महिलांमध्ये असुरक्षिततेची भावना निर्माण होत असून, नोकरदार, विद्यार्थीनी व गृहिणी आणि अल्पवयीन मुलींचे मनोबल वाढविण्याकरिता व ही असुरक्षिततेची भावना मनातून काढून टाकण्याकरिता महिलांना सक्षम होण्याच्या उद्देशाने शासनाने ठोस पावले उचलून धोरणात्मक उपाययोजना, किशोरी मुलींसाठी व किशोरवयीन मुलांकरिताही आत्मविश्वास / व्यक्तिमत्व विकास प्रशिक्षणासारखे कार्यक्रम घेण्याची गरज, राज्य शासनाने केंद्राकडे पत्रव्यवहार व त्याचा पाठपुरावा करुन मुंबईतील उपनगरीय रेल्वेच्या मध्य, पश्चिम व हार्बर अशा तीनही रेल्वे मार्गावरील स्थानके, ट्रेनमधील डब्यांमध्ये महिला डब्यांत रात्रीच्या वेळी आवश्यक त्या ठिकाणी पुरेसे पोलीस कर्मचारी नेमण्याकरिता करावयाची मागणी, नोव्हेंबर, २०१७ या महिन्यात मध्ये प्रदेश राज्याने घेतलेल्या निर्णयाच्या धर्तीवर महिला अत्याचार व बलात्कार करणाऱ्या दोषींना फाशीची शिक्षा करण्यासाठी महाराष्ट्रातही कायद्यात आवश्यक त्या सुधारणा करवून घेणे, याकडे शासनाने लक्ष देण्याची गरज याबाबत शासनाने गांभीर्याने उपरोक्त सर्व बाबींवर शासनाने त्वरीत करावयाची कार्यवाही व उपाययोजना."

**(दुपारी १२.०० वाजता)**

**एक : प्रश्नोत्तरे.**

**दोन : कागदपत्र सभागृहासमोर ठेवणे -**

**वने मंत्री** : "महाराष्ट्र वन विकास महामंडळ मर्यादित यांचा सन २०१५-२०१६ या वर्षाचा त्रेचाळीसावा वार्षिक अहवाल आणि हिशेब" सभागृहासमोर ठेवतील.

**तीन : "लोकलेखा समितीचा अठ्ठाविसावा अहवाल सादर करणे."**

**चार : "विधानपरिषद आश्वासन समितीचा एकशेचौऱ्याण्णवा अहवाल सादर करणे."**

**पाच : म.वि.प. नियम ९३ अन्वये सूचना — (असल्यास).**

**सहा : म.वि.प. नियम १०१ - अ अन्वये विशेष उल्लेख - (असल्यास).**

## - मध्यंतर -

**सात : शासकीय विधेयके -**

**विधानसभेने संमत केल्याप्रमाणे - विचार, खंडश: विचार व संमत करणे.**

(१) **"सन २०१७ चे वि.स.वि. क्रमांक ६० - महाराष्ट्र सार्वजनिक विश्वस्तव्यवस्था (तिसरी सुधारणा) विधेयक, २०१७"**

**विधेयक प्रवर समितीकडे पाठविण्याबाबत श्री. शरद रणपिसे, वि.प.स. यांचा प्रस्ताव :-**

"सन २०१७ चे वि.स.वि. क्रमांक ६० - महाराष्ट्र सार्वजनिक विश्वस्तव्यवस्था (तिसरी सुधारणा) विधेयक, २०१७ खालील सदस्यांच्या प्रवर समितीकडे

त्यावरील प्रतिवृत्त **दोन महिन्यांच्या आत** सादर करण्याचा अनुदेश देऊन विचारार्थ पाठविण्यात यावे."

(१) मुख्यमंत्री
(२) श्री. धनंजय मुंडे, विरोधी पक्ष नेता तथा वि.प.स.
(३) श्री.शरद रणपिसे, वि.प.स.
(४) श्री.संजय दत्त, वि.प.स.
(५) ॲड.निरंजन डावखरे, वि.प.स.
(६) श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, वि.प.स.
(७) श्री.सतिश चव्हाण, वि.प.स.
(८) डॉ.नीलम गोऱ्हे, वि.प.स.
(९) श्री.कपिल पाटील, वि.प.स.
(१०) श्री.विजय ऊर्फ भाई गिरकर, वि.प.स.

---

**(२) "सन २०१७ चे वि.स.वि. क्रमांक ६१ - पंढरपूर मंदिर (सुधारणा) विधेयक, २०१७"**

---

**(३) "सन २०१७ चे वि.स.वि. क्रमांक ६२ – महाराष्ट्र नगरपरिषदा, नगर पंचायती व औद्योगिक नगरी (सुधारणा) विधेयक, २०१७"**

**विधेयक प्रवर समितीकडे पाठविण्याबाबत श्री. शरद रणपिसे, वि.प.स. यांचा प्रस्ताव :-**

"सन २०१७ चे वि.स.वि. क्रमांक ६२ – महाराष्ट्र नगरपरिषदा, नगर पंचायती व औद्योगिक नगरी (सुधारणा) विधेयक, २०१७ खालील सदस्यांच्या प्रवर समितीकडे त्यावरील प्रतिवृत्त **दोन महिन्यांच्या आत** सादर करण्याचा अनुदेश देऊन विचारार्थ पाठविण्यात यावे."

(१) मुख्यमंत्री
(२) श्री. धनंजय मुंडे, विरोधी पक्ष नेता तथा वि.प.स.
(३) श्री.शरद रणपिसे, वि.प.स.
(४) श्री.संजय दत्त, वि.प.स.
(५) ॲड.निरंजन डावखरे, वि.प.स.
(६) श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, वि.प.स.
(७) श्री.सतिश चव्हाण, वि.प.स.
(८) डॉ.नीलम गोऱ्हे, वि.प.स.
(९) श्री.कपिल पाटील, वि.प.स.
(१०) श्री.विजय ऊर्फ भाई गिरकर, वि.प.स.

---

**(४) "सन २०१७ चे वि.स.वि. क्रमांक ५७ - महाराष्ट्र साक्षीदारास संरक्षण व**

**सुरक्षा देण्याबाबत विधेयक, २०१७"**

**विधेयक प्रवर समितीकडे पाठविण्याबाबत सर्वश्री. शरद रणपिसे, धनंजय मुंडे, वि.प.स. यांचा प्रस्ताव :-**

"सन २०१७ चे वि.स.वि. क्रमांक ५७ - महाराष्ट्र साक्षीदारास संरक्षण व सुरक्षा देण्याबाबत विधेयक, २०१७ खालील सदस्यांच्या प्रवर समितीकडे त्यावरील प्रतिवृत्त **दोन महिन्यांच्या आत** सादर करण्याचा अनुदेश देऊन विचारार्थ पाठविण्यात यावे."

| | |
|---|---|
| (१) मुख्यमंत्री | (२) श्री. धनंजय मुंडे, विरोधी पक्ष नेता तथा वि.प.स. |
| (३) श्री.शरद रणपिसे, वि.प.स. | (४) श्री.संजय दत्त, वि.प.स. |
| (५) ॲड.निरंजन डावखरे, वि.प.स. | (६) श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, वि.प.स. |
| (७) श्री.सतिश चव्हाण, वि.प.स. | (८) डॉ.नीलम गोऱ्हे, वि.प.स. |
| (९) श्री.कपिल पाटील, वि.प.स. | (१०) श्री.विजय ऊर्फ भाई गिरकर, वि.प.स. |

---

आठ : **(गुरुवार, दिनांक १४ डिसेंबर, २०१७ रोजीच्या दिवसाच्या कामकाजाच्या क्रमात दर्शविण्यात आलेल्या म.वि.प. नियम २६० अन्वये प्रस्ताव) — (अनुक्रमांक (क) व (ख)) —**

**(क) सर्वश्री.धनंजय मुंडे,** शरद रणपिसे, सुनिल तटकरे, संजय दत्त, हेमंत टकले, जयंत पाटील, अशोक ऊर्फ भाई जगताप, कपिल पाटील, प्रा.जोगेंद्र कवाडे, सर्वश्री.अमरसिंह पंडित, सतिश चव्हाण, डॉ.सुधीर तांबे, सर्वश्री.जयवंतराव जाधव, चंद्रकांत रघुवंशी, दत्तात्रय सावंत, विक्रम काळे, किरण पावसकर, ॲड.जनार्दन चांदुरकर, श्री.रामहरी रुपनवर, श्रीमती विद्या चव्हाण, श्रीमती हुस्नबानू खलिफे, श्री.ख्वाजा बेग, आर्कि. अनंत गाडगीळ, सर्वश्री.बाळाराम पाटील, अमरनाथ राजुरकर, सुभाष झांबड, अब्दुल्लाखान दुर्राणी, नरेंद्र पाटील, प्रकाश गजभिये, ॲड. राहुल नार्वेकर, सर्वश्री. सतेज ऊर्फ बंटी पाटील, हरिसिंग राठोड, आनंदराव पाटील, जयदेव गायकवाड, रामराव वडकुते, जगन्नाथ शिंदे, किरण पावसकर, **वि.प.स. यांचा म.वि.प. नियम २६० अन्वये प्रस्ताव — (चर्चा पुढे सुरू व मंत्र्यांचे उत्तर) —**

"राज्यात शासनाने कर्जमाफी योजना जाहीर करणे, कर्जमाफी जाहीर होऊन सहा महिन्यापेक्षाही जास्त कालावधी होऊनसुध्दा अद्यापही शेतकऱ्यांच्या बँक खात्यावर कर्जमाफीची रक्कम जमा झालेली नसणे, कर्जमाफीची घोषणा झालेली असली तरी सुध्दा कर्ज वाटपाचे नियोजन व्यवस्थित न झाल्याने

कर्जमाफी जाहीर झाल्यानंतर राज्यात अद्याप सुमारे १५०० हून अधिक शेतकऱ्यांनी आत्महत्या केलेल्या असणे, इनोव्हेव या कंपनीचे आर्थिक हितसंबंध जोपासण्यासाठी या योजनेत ऑनलॉईन पध्दतीने अर्ज मागवून नंतरच कर्जमाफी रक्कम देण्याचा घाट घातलेला असणे, ऑनलाईन पध्दतीने अर्ज भरतेवेळी शेतकऱ्यांना अनंत अडचणीचा सामना करावा लागत असणे, शेतकऱ्यांच्या खात्यावर जमा होणाऱ्या रकमांची सरकारच्या वतीने वारंवार खोटी आकडेवारी जाहीर करण्यात येणे, मात्र शेतकऱ्यांच्या खात्यावर किती रक्कम जमा झाली याची जिल्हानिहाय व तालुका निहाय आकडेवारी जाहीर करण्याचे मात्र सोईस्कररित्या टाळणे, राज्यात ९० टक्के पेक्षा जास्त बी.टी.कॉटन कापसावर बोंड अळीचे संकट येणे, शेतकऱ्यांच्या कापसाचे ९० टक्के पेक्षा जास्त नुकसान होणे, हे नुकसान टाळण्यासाठी शेतकऱ्यांनी केलेल्या फवारणीमुळे राज्यातील ३० पेक्षा जास्त शेतकऱ्यांचा मृत्यु झालेला असणे, कॉटन रिसर्च इन्स्टीट्युट यांनी डिसेंबर, २०१५ मध्येच बोंड अळीबाबत अहवाल दिल्यानंतर या येऊ घातलेलया संकटाकडे जाणीव करुन दिलेली असणे, बोगस कंपन्यांशी संबंधित आर्थिक व्यवहारामुळे हे संकट आलेले असणे, यात कोट्यावधी रुपयांचा कॉटन सिड स्कॅम असणे, राज्यात तूर, सोयाबीन, कापूस, उडीद, मुग यांची खरेदी होत नसणे, धानाचे केंद्र अद्याप सुरू झालेली नसणे, शेतकऱ्यांकडून सक्तीने संजीवनी योजनेच्या नावाखाली वीज बिलाची वसुली करण्यात येणे, राज्यातील मुंबईसह कोकणात ओखी वादळामुळे मच्छिमार व आंब्यासह सर्व फळ पिकांचे खुप मोठ्या प्रमाणात नुकसान झालेले असणे, किनारपट्टीवरील शेतकऱ्यांच्या पिकांबरोबरच घरांचेही नुकसान झालेले असणे, अनेक मच्छिमारांचे संसार उध्वस्त झालेले असणे, बोटींचे मोठ्या प्रमाणात नुकसान झालेले असणे, त्यामुळे कोकणातील शेतकरी सुध्दा हवालदील झालेला असणे, याबरोबरच उत्तर महाराष्ट्र, पश्चिम महाराष्ट्र व मराठवाड्याच्या काही भागात ओखी वादळामुळे हवामानात बदल होऊन पिकांवर किड रोगाचा प्रादुर्भाव वाढून नुकसान झालेले असणे, धानाच्या पिकावर मावा, तुडतुडे रोगाचा मोठा प्रादुर्भाव झालेला असणे, त्यामुळे उत्पादनात घट होणे, सर्वच शेतमालाला भाव न मिळणे, कृषी पिक विमा योजनेत खरीप व रब्बी हंमागातील पिक विमा नुकसान भरपाईसाठीचा हप्ता हजारो शेतकऱ्यांनी बँकेत भरणे, बँकांच्या हलगर्जीपणामुळे लाखो शेतकऱ्यांना पिक विमा नुकसान भरपाईची रक्कम मिळालेली नसणे, अनेक बँकांनी मंजूर विम्याची रक्कम इतरत्र गुंतवणूक करुन त्यावर कोट्यावधी रुपयांची नफेखोरी करणे, त्यातच कर्जमाफी न मिळणे, बोंड अळीमुळे आलेले संकट, यामुळे संकटात सापडलेल्या शेतकऱ्यांमध्ये वैफल्यग्रस्तता वाढून आत्महत्यांचे वाढत जाणारे सत्र, शेतकऱ्यांना दिलासा देण्यासाठी तातडीने त्यांना कर्जमुक्त करणे, बोंड अळीमुळे झालेल्या नुकसानीबद्दल एकरी २५ हजार रुपये मदत देण्याची आवश्यकता, सक्तीने

होणाऱ्या वीजबिल वसुलीला स्थगिती देणे, हमीभाव खरेदी केंद्र सुरू करण्याची आवश्यकता, ओखी वादळामुळे नुकसान झालेल्या शेतकऱ्यांना त्वरीत मदतीची गरज, या सर्व बाबतीत शासनाने त्वरीत करावयाची कार्यवाही व उपाययोजना विचारात घेण्यात यावी."

(ख) **प्रा.अनिल सोले,** अॅड. अनिल परब, श्री.गिरीश व्यास, डॉ.(श्रीमती) नीलम गोऱ्हे, सर्वश्री. परिणय फुके, रविंद्र फाटक, श्रीमती स्मिता वाघ, सर्वश्री. तानाजी सावंत, मितेश भांगडिया, गोपीकिसन बाजोरिया, प्रविण दरेकर, विनायक मेटे, विजय ऊर्फ भाई गिरकर, सुजितसिंह ठाकूर, **वि.प.स. यांचा म.वि.प. नियम २६० अन्वये प्रस्ताव –**

"राज्यात विदर्भातील सर्व जिल्हे व मराठवाड्यात पडलेला कमी पाऊस, त्यामुळे निर्माण झालेली परिस्थिती विचारात घेण्याची आवश्यकता, या भागातील सिंचनाचा अनुशेष वेगाने पूर्ण करण्याची गरज, विदर्भातील अपुरे सिंचन प्रकल्प पूर्ण करण्याकरिता केंद्राच्या सहाय्याने तयार केलेली बळीराजा जलसंजीवनी योजना तातडीने कार्यान्वित करण्याची आवश्यकता, बेंबळा प्रकल्पाच्या कामाला देण्यात आलेली गती, माजी पंतप्रधान स्व.राजीव गांधी यांनी भूमीपुजन केलेल्या गोसीखुर्द प्रकल्पाच्या सर्व परवानग्या प्राप्त करुन प्रकल्पाची किंमत केंद्र शासनाने निश्चित करण्यासाठी झालेली कार्यवाही, अपुऱ्या पावसामुळे मूग, उडीद, सोयाबीन, कापुस, तूर व हरभरा इ.पिकांचे उत्पादन ३० ते ४० टक्क्यांवर येणे, डुक्कर, हत्ती इ. जनावारांमुळे होणारे शेतीचे नुकसान रोखण्याच्या दृष्टीने प्रतिबंधात्मक कार्यवाही करण्याची आवश्यकता, पाणंद रस्त्यांचे बांधकाम व मजबुतीकरण प्राधान्याने करणे, शेतकऱ्यांचे उत्पन्न दुप्पट करण्याच्या उद्देशाने उत्पादन खर्च कमी करणे, नैसर्गिक व सेंद्रिय शेती आणि फळबागांच्या लागवडीस प्रोत्साहन देणे, संत्राउद्योग, दुग्धव्यवसाय, कुकुटपालन, मत्स्यव्यवसाय इ. शेतीच्या जोडधंद्यांना प्रोत्साहन देणाऱ्या योजना कार्यान्वित करणे, शेतमालाला किमान हमीभावाप्रमाणे दर मिळण्याची व जेथे कमी भाव असेल तेथे अनुदान देण्याची गरज, जलयुक्त शिवार योजनेमुळे शाश्वत सिंचनाच्या सुविधा उभारण्यासाठी मोठ्या प्रमाणात आलेली गती, ही योजना अधिक प्रभावी करण्याकरिता या योजनेच्या अटी व निकष शिथिल करण्याची आवश्यकता, कृषीपंपांना दिवसा १२ तास वीज उपलब्ध करण्याच्या दृष्टीने सोलर फिडरची योजना कार्यान्वित करणे व वीजपंप जोडणीच्या प्रलंबित अर्जांचा डिसेंबर, २०१७ पर्यंत शीघ्रगतीने निपटारा करण्याची आवश्यकता, राज्यातील वीज वितरण व्यवस्था अधिक मजबुत करण्यासाठी नविन उपकेंद्र, रोहित्र व पायाभूत सुविधा उपलब्ध करण्याची आवश्यकता, सिंचन अनुशेषाच्या भागात अधिक अनुदान देण्याची गरज, नानाजी देशमुख कृषी संजीवनी योजनेमध्ये शासनाने ४ हजार ५०० कोटी रुपये उपलब्ध करुन दिले असणे, त्यामुहे ५ हजार गावांमध्ये शेती उत्पादन वाढून शेतकऱ्यांचे जीवनमान उंचावणे

व शेतमालाला बाजारपेठ उपलब्ध झाली असणे, आत्महत्याग्रस्त ६ जिल्ह्यांपेक्षा एकट्या मुंबईला अधिक कर्जमाफी देण्याचे पूर्वीच्या शासनाने धोरण असताना अवघ्या ५ महिन्यात संपूर्ण राज्यभरात कर्जमाफीची प्रक्रिया गतीने पूर्णत्वाकडे येणे, कृषी खात्यातील रिक्त पदे तातडीने भरणे व आशाच्या धर्तीवर शेतकरी मित्र नेमण्याची आवश्यकता, केंद्र शासनाने नदीजोड प्रकल्प राज्यात कार्यान्वित करण्याची आवश्यकता, एमआरईजीएस मध्ये मोठ्या प्रमाणात सिंचन विहिरी करण्याची आवश्यकता, कृषीमालावर आधारित प्रक्रिया उद्योग उभारणीसाठी विशेष आर्थिक क्षेत्र उभे करण्याची आवश्यकता, विदर्भाच्या समग्र विकासाला वेग देण्याची आवश्यकता, अमरावती भागात उभारण्यात येणाऱ्या टेक्सटाईल पार्कला अधिक गती देण्याची आवश्यकता, मोर्शीत संत्रा प्रक्रिया प्रकल्प सुरू करणे व संत्रा धोरण जाहिर करणे, मिहानमध्ये मोठ्या संख्येने येत असलेली गुंतवणूक, छत्रपती शिवाजी महाराज शेतकरी सन्मान योजना यशस्वीपणे व पारदर्शकरित्या राबविल्यामुळे शेतकरी पुन्हा कर्ज घेण्याकरिता पात्र होणे, मागील ३ वर्षात शासनाने शेतीमधील गुंतवणूक वाढविल्यामुळे शेतीचा विकास दर सतत नकारात्मक राहत असताना हा दर प्रथमच + १२.५ टक्क्यांवर नेण्यास शासनास आलेले यश, राज्यातील शेतकरी कायमस्वरुपी स्वबळावर उभा राहू शकेल व त्याला भविष्यात कर्ज घेण्याची पाळी येणार नाही या दृष्टीने योजना आखून त्या तातडीने कार्यान्वित करण्याची आवश्यकता, याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना विचारात घेण्यात यावी."

## — अशासकीय कामकाज —
## (बैठकीच्या अखेरचे २ १/२ तास)

**नऊ : अशासकीय ठराव :-**

(१) **(शुक्रवार, दिनांक ११ ऑगस्ट, २०१७ रोजीच्या दिवसाच्या कामकाजाच्या क्रमात दर्शविण्यात आलेला प्रलंबित अशासकीय ठराव)—**

**श्री.धनंजय मुंडे, वि.प.स. यांचा ठराव क्रमांक ८६ — (मंत्र्यांचे उत्तर)-**

"राज्यातील सुशिक्षित बेरोजगारांचे वाढते प्रमाण, नोकरी व रोजगाराअभावी त्यांच्यात निर्माण झालेले वैफल्य, शासनाने बंद केलेला सुशिक्षित बेरोजगार भत्ता, रोजगाराच्या भाग भांडवलासाठी बँकांसारख्या आर्थिक संस्थाकडून येणाऱ्या अडचणी, या बाबी विचारात घेता बेरोजगारांच्या समस्या परिणामकारकपणे सोडविण्यासाठी व गरीब कुटुंबातील व्यक्तिला रोजगार मिळविण्याच्यादृष्टीने एक सक्षम व स्वतंत्र यंत्रणा स्थापन करण्यात यावी व सुशिक्षित बेरोजगारांना पुन्हा भत्ता सुरू करावा, रोजगारासाठी

भागभांडवलाची सोय करावी व बंदी घालण्यात आलेली नोकर भरती पुन्हा सुरू करावी, अशी शिफारस ही विधानपरिषद शासनास करीत आहे."

**(मंगळवार दिनांक १२ डिसेंबर, २०१७ रोजीच्या बॅलेटद्वारा ठरविलेल्या प्राथम्यक्रमानुसार खालील ठराव दाखविण्यात आले आहेत)** -

(२) **डॉ. सुधीर तांबे, वि.प.स. यांचा ठराव क्रमांक १५३** -

"राज्यातील पूर्व प्राथमिक शिक्षणासाठी सुमारे एक लाख अंगणवाड्याची संख्या समाधानकारक जरी असली तरी या अंगणवाड्याद्वारे दर्जेदार पूर्व प्राथमिक शिक्षण मिळत नसणे, वैद्यकीय शास्त्रानुसार लहान मुलांच्या मेंदूची ९० टक्के वाढ ही सहा वर्षापर्यंत होत असणे, विद्यार्थ्यांमध्ये शैक्षणिक आवड निर्माण होणे, ज्ञानेद्रियांचा योग्य विकास होणे, तसेच बौध्दिक विकासाच्या दृष्टीने हा कालावधी अत्यंत महत्वाचा असल्याने यासाठी शिक्षण देण्यासाठी तज्ञांची समिती गठीत करुन विशेष कार्यक्रम आखावा, अशी शिफारस ही विधानपरिषद शासनास करीत आहे."

(३) **श्री.सुनिल तटकरे, वि.प.स. यांचा ठराव क्रमांक १८** -

"कोकणातील आंबा, काजू इत्यादी पिकांचे नैसर्गिक आपत्तीमुळे फार मोठ्या प्रमाणात होणारे नुकसान लक्षात घेता अन्नधान्य, गळीतधान्य, तेलबिया इत्यादी पिकांसाठी केंद्र शासनामार्फत पुरस्कृत करण्यात आलेली सर्वंकष पिक बिया योजना ठाणे, रायगड, रत्नागिरी व सिंधुदूर्ग या जिल्ह्यांतील आंबा, काजू इत्यादी फळपिकांना लागू करण्याच्यादृष्टीने राज्य शासनाने केंद्र शासनाकडे आग्रह धरावा, अशी शिफारस ही विधानपरिषद शासनास करीत आहे."

(४) **श्री. प्रकाश गजभिये वि.प.स. यांचा ठराव क्रमांक ९३** -

"दादर, मुंबई येथे भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांचे चैत्यभूमी येथे स्मारक असणे, तसेच डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांचे वास्त्यव्य दादर येथे हिंदू कॉलनीत राजगृह येथे होते, आताही राजगृहात डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या वस्तु ठेवण्यात आल्या असणे, दिनांक १४ एप्रिल व ६ डिसेंबर या दिवशी या महामानवाला नाव चिरंतर स्मरणात रहावे यासाठी दादर रेल्वेस्थानकाला डॉ.बाबासाहेब आंबेडकर रेल्वेस्थानक असे नाव द्यावे अशी राज्यातील सर्व अनुयायी यांची फार पूर्वीपासून मागणी असणे, ही अद्यापही मान्य न झाल्यामुळे त्यांच्यात तीव्र असंतोष निर्माण झाला असणे, अत: दादर रेल्वेस्थानकाला "डॉ.बाबासाहेब आंबेडकर" रेल्वे स्थानक असे नाव द्यावे, अशी शिफारस केंद्र शासनाला करावी, अशी शिफारस ही विधानपरिषद शासनास करीत आहे."

**विधान भवन,**
नागपूर,
दिनांक : १४ डिसेंबर, २०१७.

**डॉ.अनंत कळसे,**
प्रधान सचिव,
महाराष्ट्र विधानपरिषद.